# क्षण

निर्विवाद, क्षण ह्याचे आपल्या जिवनात अत्यंत महत्वाचे स्थान आहे. आपण म्हणतो ना एका क्षणात..... पाहता पाहता असं झालं, तसं झालं. क्षणाची निर्मितीच मुळी आपल्याला चांगले अथवा वाईट देण्यासाठी असते. त्यातही गेलेला क्षण परत येत नाही.

आपल्या इतिहासातही अशी कितीच उदाहरणं आहेत जिथे तो 'क्षण' आहे, काहि-चांगले काही वांगले. आपल्याला वाचा असल्याने आपण बोलून व्यक्त होतो. प्राणीमात्रांमध्येही "क्षणाचे" परिणाम पहायला मिळतात. क्षणाचे महत्व फार का आहे? कारण कृतीतील त्याचे वास्तव्य कार्य थोडे अन परिणाम फार जास्त! क्षणाची उत्पत्ती ही आपल्याला आश्चर्य, आनंद किंवा दुःख, उद्वेग ह्यासाठीच! मधला पर्यायच क्षणाजवळ नाहीय आणि मग अशावेळी आपण "जर-तर" अशी भाषा बोलु लागतो.

इंग्रजीत "Time is money" म्हणतात. क्षणाला वेळेला पैशाचे किंवा त्याहिपेक्षा थोडे जास्तच महत्व आहे. कारण सृष्टीचा नियमच असा आहे कि, वेळेवर होणारे काम नेहमी चांगले होते. वेळेचं बंधन प्रत्येक गोष्टीला आहे. अन ती लक्षी चौकट असणंही, चांगलच!

"क्षण हे सुवर्णक्षण" सोन्याहूनही महत्वाचे स्थान आहे. एखादी गोष्ट हातून निसटली की ह्या क्षणाची महती कळते.. ह्या क्षणाने कैकांचा घात केला. बेसावध असतांना. मग तो सुटकेचा नादही असू शकतो.

"क्षण एक पुरे प्रेमाचा वर्षाव घडो मग मरणाचा." हे क्षणाची आनंददायी बाजू सांगणारे. सुखाच्या एका क्षणाची किंमत ती किती असावी? म्हणूनच म्हणतो, क्षणासारखा क्षणच! दुसरा कुणीच त्याची जागा घेवू शकत नाही. त्याला पर्यायच नाही. इतका तो मौल्यवान आहे.

सौ. उज्वला श्रीराम प्रभुणे
वृंदावन हाईट्स
जी 403
कोथरूड, पुणे.